नि.दि.दा.क्र.४६/२०१२
जुना नि.दि.दा.क्र.३२/२००७
अशोक प्रक्षाळे वगैरे
वि.
सुरेश पगारे मयत वारस वगैरे

## आदेश निशाणी क्र.१०४ वर

साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. वादी यांनी दोन साक्षीदार यांची साक्ष नोंदवली आहे. त्यांचा प्रतिवादी यांचे तर्फे उलट तपास देखील पूर्ण झालेला आहे. त्यानंतर वादी यांनी काही कागदपत्रे दाखल केली. परंतु पुढील पुरावा देण्यासाठी अडचणी निर्माण झाल्यामुळे वादी त्यांचा पुरावा देऊ शकले नाहीत. वादी गैरहजर असल्यामुळे वादी यांचा पुरावा संपवण्यात येत आहे असा आदेश करण्यात आला. परंतु वादी हे पुरावा देण्यास तयार आहेत. तरी त्यांचा साक्षी पुरावा संपला असा झालेला आदेश रदद करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

२. त्यावर प्रतिवादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवलेला आहे. वारंवार व पुरेशी संधी देऊनही वादी यांनी पुढील साक्षी पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत दावा सुमारे १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन प्रलंबित आहे. केवळ जाणीवपूर्वक दाव्याचे कामकाज प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न वादी करत आहेत. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले आहे.

३. प्रस्तुत दावा स्थावर मिळकती संबंधीचा आहे. याच विवादय मिळकत बाबत उभय पक्षकार यांचे दरम्यान नि.दि.दा.क्र.५५/२०१५ हा प्रलंबित आहे. उभय पक्षकार यांचे दरम्यान असलेला वाद विषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा साक्षी पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहिल. परंतु प्रकरण प्रलंबित असलेला कालावधी विचारात घेता हा दावा दररोज सुनावणीसाठी ठेवणे गरजेचे आहे. न्यायालयासमोर वादी व प्रतिवादी यांचे वकीलांनी त्यास संमती देऊन सहकार्य करण्याचे मान्य केलेले आहे. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांना त्यांचा पुढील साक्षी पुरावा देण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत दावा प्रलंबित असलेला कालावधी विचारात घेऊन त्याची दररोज सुनावणी घेण्यात येत आहे.

Sd/-

दिनांक : १७/१२/२०१९

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : 17/12/2019 |
| d | Order signed by P.O. on | : 17/12/2019 |
| e | Order uploaded on | : 17/12/2019 |